**वनीकरण आणि मृद व जलसंधारण कामांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व योजनांतर्गत योजनांचे अभिसरण करून सदर अभिसरण योजनेंतर्गत फरकाची रक्कम अदा करण्याच्या प्रारुपास (Top-up model) मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः साववि-२०२२/प्र.क्र.५८/फ-११**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- **२८ जुलै, २०२३.**

वाचा:-

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.१०२/मग्रारो-१, दि.२९.०९.२०१६
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.६१/मग्रारो-१, दि.१२.०४.२०१८
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१८/प्र.क्र.१३८/मग्रारो-१, दि.०५.११.२०१८
४) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०२१/प्र.क्र.२६/रोहयो-१०अ, दि.३०.०३.२०२१
५) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.१०२(भाग-२)/मग्रारो-१, दि.१८.०६.२०२१
६) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारोहयो २०२१/प्र.क्र.७८/रोहयो ७, दि.२४.०९.२०२१
७) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०, दि.०३.०१.२०२२
८) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.१०२/मग्रारो-१, दि.२४.०१.२०२२
९) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०, दि.२४.०१.२०२२
१०) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.१०२/मग्रारो-१, दि.२४.०२.२०२२
११) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २०२१/प्र.क्र.१६०/रोहयो ७, दि.३१.०५.२०२२
१२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०२२/प्र.क्र.१७४/रोहयो-६अ, दि.१४.१२.२०२२

प्रस्तावना:-

जागतिक तापमानात होणारी वाढ, हवामान आणि ऋतूमध्ये होणारे बदल या पार्श्वभूमीवर पर्यावरण संतुलन व जैवसृष्टीची स्थिरता ठेवण्यासाठी सामुहिक स्वरुपात प्रयत्न करणे आवश्यक आहेत. त्याकरीता शासनाच्या विविध विभागांतर्गत अनेक योजना राबविण्यात येतात. राज्यातील वनाच्छादनात वाढ करण्याकरीता वन विभागामार्फत विविध योजनांतर्गत मोठ्या प्रमाणावर वनीकरण व मृद आणि जलसंधारणाची कामे हाती घेतली जातात. सदर विविध योजनांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांपैकी बरीच कामे ही वन विभागाच्या योजनांतर्गत योजनांमधून तर काही कामे ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात येतात. दरम्यान नियोजन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक ३०.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभिसरण, संयोजन आणि श्रमदानातून मनरेगांत पाहिजे ते काम घेणे आणि हवे तेव्हा पूर्ण करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार मनरेगांतर्गत अनुज्ञेय १०० टक्के कामे अभिसरणातून घेण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

०२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत देय असलेले मजुरीचे दर आणि योजनांतर्गत देय मजुरी दरात फरक आहे. सदर दोन्ही योजनांमधील मजुरीच्या दरातील फरक अभिसरणाव्दारे दूर केल्यास दोन्ही योजनांचे उद्देश जास्तीत जास्त साध्य होतील. सदर बाब विचारात घेवून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व वन विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वनीकरण आणि वन क्षेत्रांमध्ये राबविण्यात येणाऱ्या मृद व जलंसधारणासंबंधी योजनांतर्गत योजनांचे अभिसरण करून सदर अभिसरण योजनेंतर्गत फरकाची रक्कम अदा करण्याच्या प्रारुपास (Top-up model) मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वन विभागामार्फत वनीकरण आणि मृद व जलसंधारण कामांसाठी (सामाजिक वनीकरण विभागांतर्गत सार्वजनिक जमीनीवर तसेच वन विभागांतर्गत वनक्षेत्रात) राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत योजनांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसोबत अभिसरण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर अभिसरण योजनेंतर्गत वनीकरण आणि वनक्षेत्रातील मृद व जलसंधारण कामांचे अंदाजपत्रक वन विभागाच्या योजनेच्या दरानुसार तयार करण्यास तसेच सदर अंदाजपत्रकानुसार अभिसरणांतर्गत प्रत्यक्षात मजुरी अदा करतांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत येणारी मजुरीची रक्कम अदा करून मजुरीतील उर्वरित फरकाची रक्कम (Top-up) योजनेंतर्गत तरतुदीमधून अदा करण्यास सुध्दा मान्यता देण्यात येत आहे. यास फरकाची रक्कम अदा करावयाचे प्रारुप (Top-up model) असे संबोधण्यात यावे. सदर अभिसरणांतर्गत करावयाच्या कार्यवाहीसाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

**अ) नमुना अंदाजपत्रकाची निवड**

वन विभागांतर्गत विविध योजनांतर्गत योजनांव्दारे करण्यात येणाऱ्या वनीकरण तसेच वनक्षेत्रातील मृद व जल संधारणाच्या विविध कामांकरीता (कॅम्पा व इको-बटालियन वगळता), ज्या प्रचलित नमुना अंदाजपत्रकांचा वापर करण्यात येतो, त्याच नमुना अंदाजपत्रकांची निवड सदर अभिसरणांतर्गत विविध कामांचे अदांजपत्रक तयार करतांना करण्यात यावी. तसेच सदर प्रचलित नमुना अंदाजपत्रकांमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करण्याचे अथवा तांत्रिकदृष्टया काही नवीन नमुना अंदाजपत्रक तयार करण्याचे अधिकार हे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा. नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीस राहतील.

**आ) अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे तथा कार्यारंभ आदेश देणे**

वन विभागाच्या राज्य योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या विविध कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याबाबत सद्यस्थितीत प्रचलित असलेल्या तरतुदीनुसार ज्या अधिकाऱ्यांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत, तेच प्राधिकारी, सदर अभिसरण योजनेंतर्गत तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याकरीता सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

तसेच क्षेत्रीय पातळीवर प्रत्यक्ष कामे करुन घेण्यासाठी वन विभागांतर्गत प्रचलित शासन नियमातील तरतुदीनुसार घोषित करण्यात आलेल्या सक्षम वनाधिकाऱ्यांमार्फत कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

**इ) अंदाजपत्रक तयार करून मजुरीची रक्कम अदा करणे**

सामाजिक वनीकरणाचे कार्यक्षेत्र तसेच वन विभागाच्या ताब्यातील वनक्षेत्रात वनीकरणासाठी आणि वनक्षेत्रातील मृद व जल संधारण कामासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व योजनांतर्गत योजनांच्या प्रस्तावित अभिसरण योजनेंतर्गत वनीकरण आणि वनक्षेत्रातील मृद व जलसंधारणाच्या सर्व कामांचे अंदाजपत्रक वन विभागाच्या योजनेच्या दरानुसार तयार करण्यात यावे. त्यानुसार अभिसरण योजनेंतर्गत प्रत्यक्षात मजुरी अदा करताना योजनांतर्गत प्रचलित देय मजुरी पैकी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रचलित देय मजुरी अदा करून उर्वरित मजुरीतील फरकाची रक्कम (Top-Up) अभिसरण योजनेच्या माध्यमातून वन विभागाव्दारे अदा करण्यात यावी. याकरीता वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांतर्गत खर्च त्या-त्या वर्षाच्या मंजूर नियतव्ययातून भागविण्यात यावा. तसेच यापुढे वनीकरण आणि मृद व जलसंधारणासंबंधीत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत (कॅम्पा व इको-बटालियन वगळता) (वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम, महत्वाचे रस्ते, कालवे व रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड, महत्त्वाच्या रस्त्यांच्या दुतर्फा असणाऱ्या टेकड्यांचे हरितीकरण. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटिकांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण, वनीकरणाद्वारे सागरी किनारपट्टीचे संरक्षण, वनतळे/सिमेंट बंधाऱ्याचे बांधकाम, इत्यादी विविध योजना) करण्यात येणारी सर्व कामे ही सदर अभिसरण योजनेंतर्गतच करण्यात यावी. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २६३ कामे अनुज्ञेय आहेत. सदर अभिसरण योजनेंतर्गत करण्यात येणारी सर्व कामे ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वेळोवेळी केंद्र शासनाने अधिसूचनेद्वारे/अधिनियमातील तरतूदीद्वारे अनुज्ञेय असलेल्या कामापैकी असल्याची खातरजमा करून करण्यात यावीत.

**ई) कुशल कामाकरीता निधी उपलब्धतेबाबत**

वनीकरणाची कामे ही ऋतुमानावर अवलंबून असल्यामुळे सदरची कामे विहित कालावधीतच पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्याकरीता कुशल कामासाठीचा निधी वेळेवर उपलब्ध होणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे वन विभागांतर्गत सदर योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या वनीकरणाच्या कामांपैकी रोपवाटिकांची कुशल कामे ही कालबध्द पध्दतीने सुरु होणे आवश्यक असल्याने सदर कामे ही केवळ योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून पूर्ण करण्यात यावीत.

**उ) शिस्तभंग विषयक कार्यवाहीबाबत:-**

सदर योजनेची अंमलबजावणी करतांना अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर वन विभागाच्या प्रचलित सेवाशर्तीविषयक नियमानुसार वन विभागातील सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

०२. अभिसरणांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विविध कामांच्या अंदाजपत्रकानुसार कामे पूर्ण करण्यात आल्यानंतर सदर कामांकरीता अदा करावयाच्या देयकांमधील मजुरीच्या एकूण रकमेपैकी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रचलित देय मजुरीची रक्कम अदा करून उर्वरित मजुरीतील फरकाची रक्कम (Top-Up) ही संबंधित राज्य योजनेंतर्गत त्या-त्या वर्षात उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून अदा करण्यात यावी. सदर फरकाची रक्कम ही त्या-त्या वेळी प्रचलित असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अदा करावयाच्या मजूरीचे दर तसेच योजनांतर्गत योजनेकरीता (कामगार आयुक्त, मुंबई यांनी निश्चित केलेला मजुरीचा दर) निश्चित करण्यात आलेल्या मजुरीच्या दरातील फरकानुसार असेल. तसेच उक्त मुद्दा क्रमांक इ) येथे नमूद केल्यानुसार सदर अभिसरण योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या वनीकरणाच्या कामांपैकी रोपवाटिकांची कुशल कामे ही कालबध्द पध्दतीने सुरु होणे आवश्यक असल्याने सदर कामे ही केवळ योजनांतर्गत त्या-त्या वर्षी उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून पूर्ण करण्यात यावीत.

०३. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाने दिनांक १६ जुलै, २०२३ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १९४/व्यय-१० दिनांक २०.०४.२०२३ व नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२७/१४७५ दिनांक १३.०४.२०२३ तसेच रोजगार हमी प्रभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६/मग्रारो-५, दिनांक १८.०४.२०२३ अन्वये प्रस्तावास प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२३०७२८१८०२२३२८१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VENUGOPAL REDDY BOLLAVARAM

Digitally signed by VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=97575b20152cd7d6140b21e873943cf8e0b594f98f7d940a604a875057f9a5c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ADC518D1EC700B3AD7386666A2EAA0C03E0791D886CF553BBCC7819653DDCF29, cn=VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
Date: 2023.07.28 18:17:01 +05'30'

**(बी.वेणुगोपाल रेड्डी)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

५. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

६. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

८. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई

९. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

१०. मा. उपाअध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

११. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य

१२. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

१३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई

१४.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१५.प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१६.प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१७.आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर

१८. मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)

१९.वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण (६ वृत्त)

२०.उप वनसंरक्षक (प्रा) (सर्व)/विभागीय वन अधिकारी (प्रा)/उपविभागीय वन अधिकारी (प्रा)

२१. विभागीय वन अधिकारी,सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)

२२.महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २ , मुंबई व नागपूर,

२३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-३२.

२५.निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई

२६.वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२

२७.नियोजन विभाग, का.१४७५, मंत्रालय, मुंबई-३२

२८. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२९.कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

३०.उप सचिव/अवर सचिव(सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

३१.**निवडनस्ती फ**-११.